**<u>नियमीत दिवाणी दावा क्र. ०६/२०२३ मधील</u>**
**<u>निशाणी १४ वरील आदेश</u>**
कपीला ठाकरे विरुध्द मधुकर पारसकर
(दिनांक २८ नोव्हेंबर, २०२४)

प्रतिवादी यांनी त्यांचे विरुध्द झालेला दिनांक २९.०८.२०२३ रोजीच्या एकतर्फा आदेश रद्द करणेकामी अर्ज दाखल केलेला आहे.

**२.** प्रतिवादींचे म्हणणे की, प्रतिवादी यांना दाव्याचे समन्स व्यवस्थित जारी करण्यात आलेले नाही. प्रतिवादी यांना अनेक व्याधी असल्याने त्यांचा उपचार अकोला येथे चालु आहे. प्रतिवादी क्रमांक २ रिधोरा येथे राहत असल्याने त्यांना दाव्याबाबत कोणतीही माहिती नव्हती. त्यामुळे दिनांक २९.०८.२०२३ रोजी निशाणी १ वर न्यायालयाने त्यांचे विरुध्द एकतर्फा आदेश पारित केलेला आहे. सदर आदेश नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने रद्द करणे आवश्यक असुन अर्ज मंजुर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

**३.** वादीने निशाणी १५ अन्वये प्रतिवादीच्या अर्जाला म्हणणे दाखल करुन आक्षेप घेतलेला आहे. प्रस्तुत अर्ज प्रतिज्ञापत्रसह दाखल केलेला नसल्याने कायदयाने **५.**चालणारा कायदेशीर नाही. अर्जात नमुद केलेली कारणे कोणत्याही कागदोपत्री पुरावा आणि प्रतिज्ञालेखासह दिलेले नसल्याने संयुक्तिक नाही. त्यामुळे अर्ज खारीज करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

**४.** उभय पक्षांचा युक्तिवाद ऐकला. अर्ज व म्हणणे वाचले. अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुत दावा निरंतर मनाईहुकूम मिळणेकरता दाखल केला आहे आणि प्रतिवादी यांना निशाणी ७ अन्वये दिनांक १०.०३.२०२३ रोजी अनुक्रमे प्रतिवादी क्रमांक १ तर्फे त्याचे मुलावर आणि प्रतिवादी क्रमांक २ तर्फे त्याच्या पत्नीवर समन्सची बजावणी केलेली असल्याचे बेलिफ अहवालावरुन दिसुन येते. त्यामुळे प्रतिवादी यांना समन्सची बाजावणी झाली नाही असे प्रतिवादींचे म्हणणे स्विकाहार्य नाही. प्रतिवादी यांना दिनांक १०.०३.२०२३ रोजी नोटीस व समन्सची बजावणी होवुन देखील ते हजर झाले नाही. म्हणुन दिनांक २९.०८.२०२३ रोजी त्यांचे विरुध्द एकतर्फा आदेश पारित**५.५.**

करण्यात आला. त्यानंतर प्रतिवादी हे दिनांक २७.०३.२०२४ रोजी प्रकरणात हजर झाले आणि त्यांनी प्रस्तुत अर्ज दाखल केलेला आहे.

**५.** वादीने अर्जावर मुख्यत्वे दोन आक्षेप घेतलेले आहेत, १. अर्ज प्रतिज्ञालेखासह दाखल केलेला नाही. २. अर्जामध्ये नमुद आजारपणाच्या कारणासाठी कोणतेही कागदपत्रे दाखल केलेली नाही. सुनावणी दरम्यान प्रतिवादी यांच्या तर्फे विधिज्ञ श्री. पाटकर यांनी अर्जास प्रतिज्ञालेख सादर करतो असे निवेदन केल्यामुळे प्रकरण तहकूब करण्यात आले. आजरोजी प्रतिवादी तर्फे विधिज्ञ श्री. पाटकर यांनी निशाणी १८ अन्वये प्रतिवादी सुधाकर हिम्मतराव पारसकर यांचे अर्जाच्या कथनापुष्टयर्थ प्रतिज्ञापत्र सादर केलेले आहे. त्याचप्रमाणे त्यांनी प्रतिवादी क्रमांक १ मधुकर पारसकर यांचे आजारपणाबाबत वैद्यकीय दस्तावेज अभिलेखावर दाखल केलेले आहेत. अभिलेखावर प्रतिवादींचा अर्ज प्रतिज्ञालेखासह आणि संयुक्तिक दस्तासह दाखल केलेला आहे. नैसर्गिक न्याय तत्वानुसार पक्षकाराराला त्याचे म्हणणे मांडण्याची संधी दिली गेली पाहिले. प्रतिवादी यांचा अर्ज नाकारल्यास प्रतिवादी यांना नैसर्गिक न्यायतत्वापासुन वंचित राहावे लागेल. त्यामुळे प्रतिवादी यांचे विरुध्द झालेला दिनांक २९.०८.२०२३ रोजीचा एकतर्फा आदेश न्यायाच्या दृष्टीने आणि दावा गुणवत्तेवर निकाली होणेकरिता रद्द करणे आवश्यक आहे. सबब, मी खालील आदेश पारित करित आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज रु. ३०० /- च्या खर्चावर मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादी यांचे विरुध्द झालेला दिनांक २९.०८.२०२३ रोजीचा एकतर्फा आदेश रद्द करण्यात येतो.

PATIL DIPMALA MAHENDRA

Digitally signed by PATIL DIPMALA MAHENDRA
Date: 2024.11.29 11:33:56 +0530

दिनांकः २८.११.२०२४
बाळापूर.

(श्रीमती डी. एम. पाटील)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, बाळापूर.

| I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same, word to word, as per the original order. | | |
|---|---|---|
| Name of the Court | :- | **Smt. D. M. Patil**<br>Civil Judge, J.D. & J.M.F.C.,<br>Balapur |
| Name of the Stenographer | :- | A.S.Gawali |
| Date of Decision | :- | 28/11/2024 |
| Order signed by P.O on | :- | 28/11/2024 |
| Order uploaded on | :- | 29/11/2024 |